# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र   जिल्हा District: मुंबई   पोलीस ठाणे Police Station: आ.प्र.वि. मुंबई   पहिली खबर क्र. FIR No.: 03   वर्ष Year: 2026   दिनांक Date: 11/02/2026

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988   कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act ..........   कलमे Sections ..........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence :   वार Day ..........   तारीख पासून Date from: जुलै 2024 पासून   वेळ Time ..........   तारीख पर्यंत Date to: 03/04/2025 पर्यंत.   वेळ Time ..........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००   (2) ०३.०० ते ०६.००   (3) ०६.०० ते ०९.००   (4) ०९.०० ते १२.००   (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००   (7) १८.०० ते २१.००   (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.   तारीख Date: 09/01/2025   वेळ Time ..........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 19/2026   तारीख Date: 11/02/2026   वेळ Time: 12:05

4. माहितीचा प्रकार Type of Information ..........   लेखी / तोंडी Written / Oral: लेखी.

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..........   चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ..........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ..........   ठिकाणाचे नंबर No. if any ..........   गल्ली ..........   रस्त्याचे नाव Name of Road ..........
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच ईस्ट वॉर्ड सांताक्रुझ पूर्व, मुंबई

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..........   गाव Village ..........   पोस्ट Post ..........   तालुका Taluka ..........   जिल्हा Dist. ..........   राज्य State ..........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........   तालुका Taluka ..........   जिल्हा Dist. ..........   राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: हरिदास किल्लेदार
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: रामचंद्र किल्लेदार
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 52 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय   फोन नं. Phone No.: 9821116864
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........   दिल्याचा दिनांक Date of issue ..........   दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........
(f) व्यवसाय Occupation: नोकरी - [illegible] आप्रवि मुंबई
(g) धर्म Religion: हिंदू   जात Caste: मराठा   जनजात Sub-Caste ..........
(h) पत्ता Address ..........   गल्ली/सर्व्हे नं. Ward ..........   घर/नाव नं. House Name No. ..........   फोन/मो. नं. Phone No. ..........   पॅन नं. Pan No. ..........   वोटर्स नं. Card No. ..........

रस्त्याचे नाव Road ..........   जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........   गाव Village ..........   पोस्ट Post ..........   पो. स्टे. P. Stn. ..........

तालुका Taluka ..........   जिल्हा Dist. ..........   राज्य State ..........   सध्याचा पत्ता Present Address: A-701 [illegible] CBS, घाटकोपर (प). मुं.86.

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) रुपेश लोखंडे (दुय्यम कनिष्ठ अभियंता) म.न.पा. एच ईस्ट वॉर्ड सांताक्रुझ (पूर्व)
2) कृष्णा कादर म.न.पा. एच ईस्ट वॉर्ड, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई

खालील फिर्यादि श्री. हरिदास रामचंद्र मिल्लेवार, ला.प्र.वि. मुंबई यांनी दि ११/०२/२०२६ रोजी सरकारतर्फे दिलेली फिर्यादी जबाब हा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केला असून, तोच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल समजण्यात येत आहे.

समक्ष

Rumeel

(प्रमोद दुधे)

पोलीस निरीक्षक.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Hatleal

11/02/2026

जबाब                दिनांक :— ११/०२/२०२६

श्री. हरिदास रामचंद्र किल्लेदार, वय ५२ वर्षे, व्यवसाय—नोकरी, (सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,मुंबई, वरळी) रा.ठी. ए ७०१, गुलिस्तान कंम्पाऊंड, पोलीस अधिकारी वसाहत, घाटकोपर पोलीस ठाणे कम्पाऊंडच्या मागे, एलबीएस रोड, घाटकोपर पश्चिम, मुंबई ८६, मो.क्र. ९८२११९६८६४.

---

मी वरीलप्रमाणे असून, नमूद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहत आहे. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई वरळी येथे दि. ०२/०७/२०२५ रोजी पासून सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर कार्यरत आहे.

लाप्रवि मुंबई या ठिकाणी कार्यरत असलेले सपोआ श्री.सुरेश शिरसाठ यांची बदली झाल्यामुळे त्यांच्याकडील तपास व चौकशी करीता त्याच्याकडे प्रलंबित असलेली प्रकरणांची कागदपत्रे पुढील कार्यवाही करीता मा. अपर पोलीस आयुक्त ,मुंबई यांचे आदेश क्र जा.क्र. ६८४६/लाप्रवि/बृमुंवि/अपोआ/उ.चौ. ०६/१९, दि. ०९/०७/२०२५अन्वये आम्हास वर्ग करण्यात आली आहेत.

प्राप्त कागदपत्रांमध्ये लाप्रवि, मुंबई येथिल पडताळणी क्र ०२/२०२५ चे कागदपत्रांचा समावेश होता. सदर प्रकरणाची पाहणी केली असता तक्रारदार श्री आंनद किशोर बागडे,रा. ठी:— २३१, कापसे रोड, मु.पो ता. निफाड, जि. नाशिक—७१, मो.क्र. ८८३०९००३२६ यांनी दि. ०९/०१/२०२५ रोजीचा मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि मुंबई यांच्या नावे दिलेला लेखी तक्रारी अर्ज आहे. सदर तक्रार अर्जामध्ये त्यांनी तक्रार केली आहे की, त्यांच्या मालकीचा प्लॉट नं ११२, टी बी साखळे मार्ग, खेरवाडी, बांद्रा पुर्व, येथे आहे. सदर प्लॉटवरती अनधिकृत बांधकाम झाले असल्याने सदरचे बांधकाम निष्कासन करण्याकरीता त्यानी दि. २६/०५/२०२४ रोजी बी.एम.सी., एच/ई वार्ड, सांताक्रुझ पुर्व मुंबई यांचेकडे अर्ज केला होता. सदर निष्कासन कामासाठी बी.एम.सी. एच/ई वार्ड चे इंजिनिअर कोथरे व मुकादम कादर यांची नेमणूक केली होती. नमूद बी.एम.सी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना जुलै २०२४ मध्ये फोन करून बोलावून घेतले. त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक याना भेटल्यानंतर त्यानी प्लॉटवरती असणारे अनिधिकृत बांधकाम निष्कासनासाठी विनंती केली. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ०२ लाख रूपये लाचेची मागणी केली व सदर रक्कम दिल्याशिवाय निष्कासन होउ शकत नाही असे सांगितले. म्हणून तक्रारदार यांनी प्रथम ७०,०००/— रोखीने दिले. त्यानंतर लोकसेवक यानी तकारदार यांचेकडे उर्वरित रक्कमेसाठी तगादा लावल्याने नंतर तक्रारदार यांनी दि. ०१/१२/२०२४ रोजी रू ५०,०००/— दिले. तसेच दि. १२/१२/२०२४ रोजी रू ३०,०००/— असे एकूण रू. १,५०,०००/— एवढी रक्कम दिली. दि. ०८/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांचे मालकीचे जागेवर अनिधिकृत बांधकाम सुरू असल्याची त्याना माहिती मिळाल्यानंतर तक्रारदार हे दि. ०९/०१/२०२५ रोजी दुपारी १२.३० वा. लोकसेवक मुकादम कादर यांची भेट घेतली असता त्यांनी मागणी करण्यात आलेल्या रक्कमेपैकी उर्वरीत रक्कम पूर्ण करून दया तरच निष्कासन करण्यात येईल असे सांगितले व सायंकाळी भेटण्यास सांगितले. तक्रारदार यांना बी.एम.सी चे ज्युनिअर इंजिनिअर कोथरे व मुकादम कादर यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष येवून लेखी तक्रार दिली असल्याचे तक्रारी अर्जामध्ये नमुद आहे. सदर तकारी अर्जावर पंच व तपासी अधिकारी सपोआ शिरसाठ यांच्या सहया आहेत.

तसेच सदर तकारी बाबत गोपनिय कामकाजासाठी पर्यवेक्षण अधिकारी तपासी अधिकारी यांची नेमणुक केल्याबाबत मा. अपर पोलीस आयुक्त,लाप्रवि मुंबई यांचे दि. ०९/०१/२०२५ रोजीचे आदेश आहेत. तसेच सदर तकारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाचे तपासी अधिकारी सपोआ शिरसाट यांनी पोलीस पथक, तक्रारदार व शासकिय पंच यांच्यासोबत दि.०९/०१/२०२५, दि. १०/०१/२०२५,दि. ०३/०४/२०२५ व दि. ०८/०४/२०२५ रोजीचे पडताळणी पंचनाम्यांचा समावेश आहे.

दि. ०३/०४/२०२५ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यातील झालेल्या संभाषणावरून असे दिसुन आले की, दि. ०३/०४/२०२५ रोजीच्या पडताळणी दरम्यान बीएमसी लोकसेवक कोथरे व लोकसेवक श्री. कादर यांनी खालील संभाषण करून यापुर्वी रक्कम रू १,५०,०००/– स्विकारल्याबाबत दुजोरा दिलेला आहे तसेच लोकसेवक कोथरे यांनी " काम झाल्यानंतर अजून रू १,५०,०००/– द्यायचे" असे म्हणुन लाच रक्कमेची मागणी केली व लोकसेवक कादर यांनी " हा" असे म्हणुन लाचेच्या मागणीस दुजोरा दिला असल्याचे दिसून येत आहे.

दि. ०३/०४/२०२५ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यावेळी लाच रकमेच्या मागणीच्या अनुषंगाने तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये झालेल्या संभाषणाचा भाग खालील प्रमाणे –

| | |
|---|---|
| तक्रारदार | मी तुम्हाला आता हे बघा दिड लाख रूपये दिले... बरोबर आणि दोन मध्ये डन झाल होत... ते पन्नास हजार. |
| लोकसेवक कोथरे | काम झाल्यानंतर तुम्ही अजुन दिड लाख रूपये आम्हाला द्यायचे... काम झाल्यानंतर... ०२.४४.१९ |
| लोकसेवक कोथरे | ठिक आहे... पण काम झाल्यानंतर डबल करायच... हा... ०२.४५.०५ |
| तक्रारदार | आता हे बघा... मी आता तुम्हाला किती दिलेले... दिड दिलेले आहेत... ओके... |
| लोकसेवक कोथरे | ते मला लक्षात नाही... |
| तक्रारदार | दिड दिलेले आहेत... |
| लोकसेवक कोथरे | रिटर्न केले ना... |
| तक्रारदार | ते रिटर्न केले... त्याचा संबंध नाही... दिड दिलेले आहे तुम्हाला... |
| लोकसेवक कादर | पहिले किती दिले (अस्पष्ट आवाज)... ०२.४५.१५ |
| तक्रारदार | पहिले सेव्हंटी थाऊजंड दिले... |
| लोकसेवक कादर | बराबर... |
| तक्रारदार | त्याच्यानंतर फिफ्टी थाऊजंड दिले... |
| लोकसेवक कादर | फिफ्टी थाऊजंड कधी दिले... ०२.४५.१९ |
| तक्रारदार | फिफ्टी थाऊजंड रिक्षामध्ये नाही का दिले होते... |
| लोकसेवक कोथरे | सेव्हंटी आणि फिफ्टी एक वीस झाले... |
| तक्रारदार | एक वीस झाले आणि तीस नंतर कॅश दिले होते... आठवत का ते गाडीत गेलो होतो आपुन... |
| लोकसेवक कादर | गाडीत कुठे साहेबाच्या का... |
| तक्रारदार | मोटार सायकलवर आणि हा एक अ... ड्रॉवरमध्ये दिले होते... |
| लोकसेवक कोथरे | (अस्पष्ट आवाज) साहेबांनी ते रिटर्न करून टाकले... |
| तक्रारदार | ते तुम्ही रिटर्न करून दिले... म्हणजे किती झाले आता ते... |

 

| | |
|---|---|
| लोकसेवक कोथरे | (अस्पष्ट आवाज)... |
| तक्रारदार | दिड दिड झाले... |
| लोकसेवक कोथरे | अजुन दिड तुम्हाला लागेल खर्च (अस्पष्ट आवाज)... ०२.४५.४३ |
| लोकसेवक कादर | हा... |
| लोकसेवक कोथरे | (अस्पष्ट आवाज) शंभर टक्के... |

तक्रारदार यांनी बीएमसी कडे त्यांच्या बांद्रा येथील निष्कासनासाठी केलेल्या तक्रारी अर्जा संदर्भात दि. २५/०४/२०२५ रोजी न्यायालयात पुढील सुनावणी होणार असल्या कारणाने लोकसेवक दि. २५/०४/२०२५ रोजीच्या पुर्वी संपर्क करणार असल्याची शक्यता असल्याने पुन्हा दि. ०८/०४/२०२५ रोजी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दि. ०८/०४/२०२५ रोजीच्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांना मोबाईल द्वारे संपर्क करण्यात आला असता लोकसेवक यांनी तक्रादार यांचा निष्कासन कारवाईचा मेमो त्यांच्या वरिष्ठांकडे सही करीता सादर केला असुन अद्याप पावेतो सही झाली नसल्याने पुढील दोन दिवसांत संपर्क करून सांगतो असे त्यांनी सांगितले. परंतु दि. ०८/०४/२०२५ पासुन आतापावेतो लोकसेवक यांनी तक्रारदार यांना कोणत्याही प्रकारे संपर्क केलेले नाही.

दरम्यानच्या काळात सपोआ सुरेश शिरसाठ यांची लाप्रवि मुंबई ते लाप्रवि नाशिक अशी बदली दर्शविण्यात आल्याने सदर पडताळणी प्रकरण हे आम्हास वर्ग करण्यात आले.

सदर पडताळणीच्या अनुषंगाने तक्रारदार यांना प्रत्यक्ष फोन द्वारे तसेच लेखी पत्राद्वारे लाप्रवि, मुंबई कार्यालयास हजर राहण्याबाबत कळविले असता, तक्रारदार यांनी प्रत्यक्ष फोन द्वारे कळविले की, ते कापसे रोड, निफाड, नाशिक येथे राहावयास असुन त्यांनी केलेल्या तक्रारी अर्जाच्या संदर्भात ते मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणी करीता मुंबई हजर राहतील त्यावेळी ते प्रत्यक्ष लाप्रवि कार्यालयात येवुन भेटणार असल्याचे कळविले.

त्यानंतर दि. २९/०१/२०२६ रोजीच्या तक्रारदार श्री. बागडे हे लाप्रवि कार्यालयात प्रत्यक्ष हजर झाले असता त्यांचा जबाब नोंद करण्यात आला. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, तक्रारदार यांच्या आजोबांनी खेरवाडी, प्लॉट नं १२, ही जमीन लीज वर घेतलेली असून सदर जागेवरती श्री. दुधनाथ माधव मौर्य यांनी अतिक्रमण करून खोली बांधली आहे. सदर अतिक्रमण केलेल्या जागेवर निष्कासन कारवाई करण्यासंदर्भात मनपा ईस्ट वार्ड सांताक्रुझ पुर्व या कार्यालयाचे कनिष्ठ इंजिनीयर श्री.रूपेश कोथरे व मुकादम श्री. कुकप्पा कादर यांनी तक्रारदार यांच्याकडे रू १,५०,०००/- लाच रक्कमेची मागणी केली ( यापुर्वी १,५०,०००/- रक्कम दिली गेली आहे ).सदर प्रकरणी तक्रारदार यांनी मा. दिवाणी न्यायालय दिंडोशी कोर्ट येथे सिव्हील सुट क्र २७२४/२०२४ यामध्ये तक्रारदार यांच्या बाजुने निकाल लागला असल्याने सदर निकालावर खटल्यातील विरोधक श्री. दुधनाथ मौर्य यांनी मा. उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मा. उच्च न्यायालयाने अर्ज AO क्र १३३३५/२५, दि. ०९/०४/२०२५ अन्वये सदर निष्कासन कारवाईला स्थगिती आदेश दिले आहेत. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९/०१/२०२६ असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच आलोसे श्री.रूपेश कोथरे यांची पदोन्नतीने घाटकोपर पुर्व, मनपा एन वार्ड, पंतनगर, येथे दुयम अभियंता (स्थापत्य) म्हणून बदली झाली असुन मुकादम कादर हे तक्रारदार यांच्या संपर्कात असल्याचे सांगितले.

दि. ०३/०४/२०२५ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यावरून सदर प्रकरणी बीएमसी एच/ई वार्डमधील कर्मचारी लोकसेवक कनिष्ठ इंजिनीयर रूपेश कोथरे व लोकसेवक कुकप्पा कादर यांनी तक्रारदार श्री आनंद बागडे यांच्याकडुन त्यांच्या मालकीचा प्लॉट नं ११२, टी बी साखळे मार्ग, खेरवाडी, बांद्रा पुर्व या जागेवरील निष्कासन कामासाठी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट दिसत आहे.

सदर प्रकरणी लोकसेवक कोथरे यांची अन्यत्र बदली झाल्यामुळे व निष्कासन प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे लोकसेवक हे तक्रारदार यांचे प्रलंबित कामासाठी लाच स्विकारण्याची अथवा निष्कासनाची शक्यता नसल्यामुळे आम्ही मा. वरिष्ठ यांचेकडे गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी अहवाल सादर केला असता, मा. वरिष्ठ यांनी नमूद लोकसेवक यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यास लेखी मान्यता दिलेली आहे.

तरी तक्रारदार श्री आनंद बागडे यांचे प्लॉट नं ११२, टी बी साखळे मार्ग, खेरवाडी, बांद्रा पुर्व,मुंबई या जागेवरील निष्कासन कारवाईसाठी मनपा, एच ईस्ट वार्ड, सांताक्रुझ पुर्व येथील लोकसेवक १ रूपेश कोथरे (तत्कालिन कनिष्ठ अभियंता) व लोकसेवक क्र २ कुकप्पा कादर (मुकादम) यानी तकरदार यांच्याकडे प्रलंबित निष्कासनाचे काम करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून अप्रामाणिकपणे यापुर्वी रूपए दोन लाखाची मागणी करून रू १,५०,०००/- लाच रक्कम घेतली व पडताळणी पंचनाम्यावेळी पुन्हा रू १,५०,०००/- इतक्या लाच रक्कमेची मागणी केली म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये माझी नमूद लोकसेवक यांचेविरूध्द सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

(स्वाक्षरी)

प्रमोद सुर्वे,
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(स्वाक्षरी) 11/02/2026

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ... गुन्ह्यातील मुख्य तक्रारदार श्री समीर बागडे यांचे मा.न.पा. मधील विकासकाचे प्रलंबित असलेले काम न्यायप्रविष्ट असल्याने तसेच तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रकरणाची अद्ययावत माहिती देण्यासाठी वेळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे. ... सदर येऊन माहिती देण्यास विलंब केला
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ... —
Total Value of properties stolen / involved —
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ... —
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
यातील मुख्य तक्रारदार श्री आनंद किशोर बागडे, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई या ठिकाणचे लोटवरील विकासक असून यातील मा.न.पा.चे लोकसेवक क्र. 1 व 2 यांनी मजूद तक्रारदार यांच्याकडे प्रलंबित विकासक कामासाठी रु. 2 लाख रुपये मागणी करून रु. 1,50,000/- लाच स्वीकारून घेतली व पुराव्यानिशी पंचनाम्याने पुन्हा रु. 1,50,000/- इतक्या लाच रक्कमेची मागणी केली म्हणून कलम 7, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : प्रमोद सुर्वे, पो.नि. ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ...

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ... जिल्हा ... राज्य ...

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ... Rank ... No. ... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ...
(3) Transferred to P. S. ...
District ... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature] 11/02/2026
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name प्रमोद सुर्वे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ...

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

COMMISSIONER OF POLICE ... MUMBAI ... CORRUPTION BUREAU